**निशाणी ७६ खालील आदेशान्वये प्रकरण पुन्हा वादीच्या पुराव्यासाठी लावुन वादीचे निशाणी ७१ वर दाखल केलेले सरतपासाचे शपथपत्र पुराव्यात वाचण्यात येत आहे.**

**सबब वादी तर्फे सा.क्र.१ चा शपथेवर पुढील सरतपास वादीचे वकील श्री जी.के.टिकार यांचेकडुन सुरू.**

१५. मी या प्रकरणात माझे पुराव्याचे शपथपत्र दाखल केले असुन त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. या प्रकरणात निशाणी ७८ या कागदपत्राच्या यादीसोबत अ.क्र.१ ला भाडे कराराचा दस्त दाखल केला आहे. त्यावर माझी सही आहे. तसेच त्यावर तत्कालीन कार्यकारी अभियंता याची सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. तो करारनामा मी लिहून दिला होता. त्यास निशाणी ७९ देण्यात येते. तसेच सदर यादीसोबत अ.क्र. २ ला मी जि.प.सर्वसाधारण ठराव दि. १९.१२.२००१ रोजीच्या ठरावाची सत्यप्रत दाखल केली आहे. त्यास निशाणी ८० देण्यात येते.

(याक्षणी सरकारी वकील यांनी अशी हरकत घेतली की, सदर प्रत ही पडताळणीकृत प्रत नाही तसेच त्यावर ठराव करणा—या अथवा अनुमोदक यांची सही नाही. त्यामुळे त्यास निशाणी देण्यात येवु नये. सदर हरकत याक्षणी राखुन ठेवली आहे.)

१६. तसेच आता मला निशाणी ३ या कागदपत्रांच्या यादीसोबत अ.क्र. ४ ला दाखल असलेली मालमत्ता पत्रकाची साक्षांकीत प्रत दाखविण्यात आली. प्रतिवादी यांचे वकीलांनी सदर प्रत प्रतिवादीला मान्य असल्याचे कथन केल्याने तयास निशाणी ८१ देण्यात येते. तसेच सदर यादीसोबत अ.क्र.१ ला महाराष्ट्र शासन ग्रमविकास विभाग यांचा दि. २५.३.२०१३ रोजीचा शासन निर्णय दाखल केला आहे. त्यास निशाणी ८२ देण्यात येते. तसेच सदर यादीसोबत अ.क्र. १२ ला मी काढलेले तिन फोटो दाखल केले आहेत. त्यास एकत्रीतरित्या आर्टीकल अ देण्यात येते.

सरतपास संपला.

**उलटतपास प्रतिवादी क्र. १, २ ३ व ५ करीता सहायक शासकीय अभियोक्ता श्री जी.एल.इंगोले यांचेकडुन सुरू**

प्रश्न    वादातील मुळ जागा ही शासनाच्या मालकीची आहे हे म्हणणे बरोबर आहे काय ?
उत्तर    नाही.

१७.    हे म्हणणे खरे नाही की वादातील जागेवर नगरपरिषदेचा पशुवैद्यकीय दवाखाना सुरू आहे. मी वादातील जागा मागण्याकरीता सन २००१ साली अर्ज केला होता. मला अर्जाची निश्चीत तारीख आठवत नाही. परंतु तो अर्ज ९ व्या महिन्यात केला होता. मी सदर अर्ज जिल्हा परिषद येथे दाखल करून त्याची घेतलेली पोहच या प्रकरणात दाखल केलेली नाही.

(याक्षणी सदर साक्षदार यांनी त्यांना चक्कर येत असल्याचे सांगुन प्रकरण तहकुब करण्याची तोंडी विनंती केली. सबब दोन्ही पक्षाचे वकीलांचे समंतीने प्रकरण पुढील तारखेपर्यतं तहकुब.)

श्रवणोत्तर स्विकृत                    माझे समक्ष

(महेश एस. काळे)
दिवाणी न्यायाधीश (व.स्तर)
अकोट.

(महेश एस. काळे)
दिवाणी न्यायाधीश (व.स्तर)
अकोट.
दि.२०.४.२०२४